## आरटीओ कार्यालय लायसन्स कॅम्पचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जानेवारी :** प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे चंद्रपूर जिल्ह्यातंर्गत लायसन्स कॅम्प आयोजित करण्यात येत आहे. सदर कॅम्पमध्ये शिकाऊ व पक्के अनुज्ञप्ती पुर्वनियोजित ऑनलाईन अपॉईंटमेंटनुसार देण्यात येणार आहेत. या ठिकाणी होणार शिबीर : २७ जानेवारी २०२५ रोजी आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन वरोरा, २८ जानेवारी रोजी एन.एच. महाविद्यालय, ब्रम्हपुरी, २९ जानेवारी रोजी शासकीय विश्रामगृह, चिमूर, ३० जानेवारी रोजी शासकीय विश्रामगृह, गोंडपिंपरी तर ३१ जानेवारी २०२५ रोजी शरद पवार महाविद्यालय, गडचांदुर या ठिकाणी सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

## कोषागार कार्यालयात निवृत्तीधारकांचा मेळावा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जानेवारी :** निवृत्तीवेतनाबाबत निवृत्ती वेतनधारकांच्या शंका, समस्या व सूचना जाणून त्यांचे निराकरण करण्यासाठी नागपूर महालेखाकार कार्यालयाच्या निर्देशानुसार चंद्रपूर जिल्हा कोषागार कार्यालयात निवृत्तीवेतन धारकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागपूर महालेखाकार कार्यालयाचे वरिष्ठ लेखाधिकारी राजेश सांगोडे, सहायक लेखाधिकारी चंद्रप्रकाश, जिल्हा कोषागार अधिकारी सुहास पवार, अपर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन शाखा) राजश्री सेलूकर, संजय पडिशालवार, संतोष फुलझेले, वरिष्ठ लेखापाल बालबिहारी प्रजापती आदि उपस्थित होते.

# मानव - वन्यजीव संघर्ष कमी करण्याचा मार्ग चंद्रपुरातूनच निघणार - वनमंत्री नाईक

## संरक्षित क्षेत्राच्या बाहेर वन्यप्राण्यांच्या संख्येवर नियंत्रणासाठी उपाययोजना' (वाईल्डकॉन - २०२५) परिषदेचा समारोप

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जानेवारी :** संरक्षित क्षेत्रांच्या बाहेर स्थानिक पातळीवरील वन्यप्राण्यांच्या मुबलक संख्येवर नियंत्रणासाठी अभिनव आणि संवेदनशील उपाययोजना' या विषयावर भारतातील पहिली परिषद चंद्रपुरात होत आहे. याचा अतिशय आनंद आहे. केंद्र सरकार आणि विविध राज्यातील अनेक तज्ज्ञांनी या संवेदनशील विषयावर येथे चिंतन आाणि मंथन केले. चंद्रपूर येथे तज्ज्ञांच्या निष्कर्षातून निघालेल्या सकारात्मक उपाययोजनेतूनच मानव – वन्यजीव संघर्ष कमी करण्याचा मार्ग निघेल, असा विश्वास राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केला.



वन अकादमी येथे 'वाईल्डकॉन – २०२५' या दोन दिवसीय परिषदेचा समारोप करतांना ते बोलत होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार, प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख शोमिता बिस्वास, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) विवेक खांडेकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (व्यवस्थापन) एम.एस.राव, महाराष्ट्र वनविकास महामंडळाचे (एफडीसीएम) व्यवस्थापकीय संचालक संजीव गौड, वन अकादमीचे संचालक एम.एस. रेड्डी, चंद्रपुरचे मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, शोभा फडणवीस आदी उपस्थित होते.

मानवाने प्राण्यांच्या जागेत अतिक्रमण केले, की प्राण्यांनी आपल्या जागेत अतिक्रमण केले, हा संशोधनाचा विषय आहे, असे सांगून वनमंत्री ना. नाईक म्हणाले, वन्यप्राण्यांची लोकसंख्या वाढली आहे, हे सत्य आहे. तसेच आपल्याकडे मानवी लोकसंख्या प्रचंड वाढली असून जमीन मात्र मर्यादीतच आहे. शिवाय वनांच्या क्षेत्रामधून विकास कामे होत आहे. त्यामुळे प्राण्यांच्या अधिवासाची जागा कमी झाली आहे. त्यामुळेच मानव – वन्यजीव संघर्षात वाढ झाल्याचे निदर्शनास येते. माणूस आणि वन्यजीव सुद्धा जगले पाहिजे. त्यामुळे या विषयावर इतर देशांनी काय उपाययोजना केल्यात, त्याचा वरिष्ठ वन अधिका-यांनी अभ्यास करावा. वनविभागात प्रत्येक क्षेत्रीय विभागानुसार किती अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे, त्याचा अहवाल सादर करावा. चंद्रपुरातील टायगर सफारी प्रकल्पाला अतिक गतीने समोर नेण्यासाठी नक्कीच प्रयत्न केला जाईल. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक नागरिकांसाठी ताडोबा सफारीचे शुल्क कमी करता येईल का, याचे अधिका-यांनी नियोजन करावे. चंद्रपूर येथे दोन दिवसीय चर्चासत्रात मांडण्यात आलेल्या प्रत्येक समस्या सोडविण्यात येतील. निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली. यावेळी त्यांनी बांबू पासून बनविलेल्या वस्तुंच्या प्रदर्शनीची पाहणी केली.

## मुल येथे सह. पतसंस्था कर्मचारी संघटनेचे प्रथम त्रैवार्षिक अधिवेशन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ९ जानेवारी :** विदर्भ नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था कर्मचारी संघ नोंदणी क्रमांक - एन पी जी- ५६५७ सलग्न भारतीय मजदुर संघ च्या वतीने रविवार ला सकाळी ११-३० वाजता डॉ. हेडगेवार सभागृह धनश्री नागरी सहकारी पतसंस्था मुल येथे सहकारी पतसंस्था कर्मचारी संघटनेच्या प्रथम त्रैवार्षिक अधिवेशन आयोजीत करण्यात आल्याची माहिती चिमूर येथे सहकारी पतसंस्था कर्मचारी संघटनेचे चिमूर तालूका प्रमुख राजू डाहारे यांनी दिली. सहकारी पतसंस्था कर्मचारी संघटनेच्या प्रथम त्रैवार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने या अधिवेशनाचे उद्घाटन भामस नई दिल्ली अ. भा. उपाध्यक्ष नीता चौबे प्रमुख अतिथी भामस विदर्भ प्रांत प्रदेश महामंत्री गजानन गटलेवार, भामस चंद्रपूर - गडचिरोली विभाग संघटन मत्री हेमराज गेडे आदि उपस्थित राहतील.

## सावली वनपरिक्षेत्रात रानगव्याचा शिरकाव गाव शेतशिवारात भटकंती, नागरिकांना वनविभागाचा सतर्कतेचा इशारा

**महासागर तालुका प्रतिनिधी**



**सावली, दि. ९ जानेवारी :** सावली वनपरिक्षेत्रा अंतर्गत रुद्रापुर , कवठी , उसेगाव , हरांबा , लोंढोली , जांब , रयतवारी , जीबगाव , पेठगाव परिसरात काल दि. ७ जानेवारी रोजी दिवसाढवळ्या रानगवा हा प्राणी अनेक नागरिकांना गाव शेतशिवारात भटकताना आढळून आल्याने नागरिकांत भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकांनी त्याचे मोबाईलमध्ये चित्रीकरण करून सोशल मीडियावर व्हायरल केल्याने वनविभाग जागे झाले असून नागरिकांनी सावधान राहावे असे आवाहन केले आहे .

सावली तालुक्यातील नागरिक आधिच वाघ बिबट्याच्या दहशतीत असतांना , खरीप हंगामातील धान पीक शेतकऱ्यांना हाती येणार या कालावधीत रानटी हत्तींच्या कळपाने धानपिकाचे शेतात धुमाकूळ घातला . त्यात अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते . आणि आता रानगवा हा प्राणी सावली वनक्षेत्रात आल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे . सावली वनपरिक्षेत्रात आधीपासूनच सावली , राजोली , पेंढरी व पाथरी विभागामध्ये अनेक वर्षांपासून रानगवा ह्या प्राण्यांचा वास्तव असल्याचे सांगितले जाते . परंतु एवढ्या वर्षात सावली तालुक्यातील वनपरिक्षेत्रात तो प्राणी कोठेही आढळला नाही . रानगवा हा तृणभक्षी प्राणी असल्याने शेतकऱ्यांचे शेतातील बांधावर मोठ्या प्रमाणात तुरपिक उभे असल्याने आणि तो गावातिल शेयशिवारात भटकत असल्याने तुरपिकांचे नुकसान होईल अशी चिंता व्यक्त केली जात आहे . सावली तालुक्यात आधिच वाघ , बिबट्याची दहशत असून आजवर कित्येक पाळीवप्राणी व मानावांचा बळी गेला आहे . तर ऐन धानपिक कापणीच्या वेळात हत्तीच्या कळपाने सावली तालुक्यातील व्याहाड ( खुर्द ) उपवनपरिक्षेत्रातील शेयशिवारात धुडगुस घातल्याने मोठ्या प्रमाणात धानपिकाचे नुकसान झाले होते . आता शेतात धानपिक नसले तरी शेतावरील बांधावर तुरपिक असल्याने वनविभागाने याचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे .

> सावली वनपरिक्षेत्रात रानगवा हा प्राणी बाहेरून भटकत आलेला दिसते . त्यामुळे तो परत निघून जाईल . तेव्हा लोकांनी एकत्र जमून आरडाओरडा करू नये , असे केल्याने रानगवा घाबरून इकडे तिकडे पळेल आणि भितीपोटी तो हल्ला करू शकतो . रानगवा मनुष्याला मारण्याच्या उद्देशाने कधीही धावत नाही किंवा मारत नाही. रानगवा शेतपिकाची नुकसान करू शकतो. तो कधीही माणसांच्या मागे धावत नाही. किंवा स्वतःहून आकसापोटी किंवा माणसांना मारण्यासाठी धावला आणि जीवित हानी झाली असे ऐकवीन्यात नाही. म्हणून नागरिकांना घाबरण्याचे काहीही कारण नाही. वनविभागाचे पथक त्याच्यावर निगराणी ठेवून आहे .नागरिकांनी सहकार्य करावे .
>
> विनोद धुर्वे ,
> वनपरिक्षेत्राधिकारी सावली

## खुर्सापार - आमडी रोडवरील पुलाच्या खाली अस्वलाचा मृत्यू

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ९ जानेवारी :** तालुक्यातील खडसंगी उपक्षेत्राअंतर्गत खुर्सापार- आमडी रोडवरील पुलाच्या खाली अंदाजे चार ते साडेचार वर्षाचे नर अस्वल मृत पावल्याची घटना बुधवार ला सकाळी १०-३० वाजताचे सुमारास वन विभागाचे कर्मचारी गस्तीवर असतांना उघडकिस आली.

यासंबधी वरिष्ठांना माहीती मिळताच अधिकारी घटना स्थळी दाखल होऊन पंचनामा करून शव वन विश्राम गृह खडसंगी येथे पशुधन विकास अधिकारी चिमूर व शंकरपुर यांचे हस्ते शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर शव दहन करण्यात आले. वन्य जीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलमान्वये वन गुन्हा क्रमांक ०९१३४/



२२८३४५/२०२५ दिनांक ०८/०१/२०२५ नोंदविण्यात आला. यावेळी बम्हपुरी वन विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक डॉ महेश गायकवाड, तरूण पर्यावरणवादी मंडळ शंकरपुरचे अमोद गौरकर, किशोर देऊरकर, उत्तम घुगरे, रूपेश चौधरी, रूपेश केदार, संजय पाटील, समित जाधव, योगेश अंतमवाड, रामदास नैताम, वनपाल, गस्त पथक, व इतर वन कर्मचारी उपस्थित होते. पुढील तपास वरिष्ठ वन विभागाचे अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार सुरू आहे.

## घोसरी येथील प्रादेशिक योजनेचा पाणी पुरवठा ठप्प

### प्रशासनाने तात्काळ लक्ष द्यावे उपसरपंच तथा भाजयुमोचे जितू चुधरी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**पोंभुर्णा, दि. ९ जानेवारी :** तालुक्यातील घोसरी येथील प्रादेशिक पाणी पुरवठा गेल्या दोन महिण्यापासून बंद पडलेलीआहे. तद्वतच जल जीवन मिशन योजनेअंतर्गत वाढीव पाणी पुरवठ्याकरीता पाईप लाईनकरीता रस्त्याच्या मधोमध खोदकाम केलेले काम रखडलेले असल्याने नागरिकांना मार्गक्रमण करणे कसरतीचे झाले आहे. प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचा शुध्द पाणी पुरवठा बंद असून महिलांना भटकंती करावी लागत असल्याने संताप पसरलेला आहे. प्रशासनाने गांभीर्याने दखल घेवून उपाययोजना करावी अशी मागणी उपसरपंच जितुभाऊ चुदरी यांनी केली आहे.



बेंबाळ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत घोसरी येथील पाणी पुरवठा प्रशासन व कंत्राटदार यांच्या दुर्लक्षीत पणामुळे अनेकदा बंद पडत असते. एवढेच नव्हे तर संपूर्ण गावाला पाणी पुरवठा होत नसल्याने जल जीवन मिशन योजनेच्या वाढीव पाणी पुरवठ्याला मंजूरी मिळाली. त्यामुळे मागील वर्षी टाकीचे बांधकाम करण्यात आले. आणि वाढीव पाईप लाईनकरीता कंत्राटदारानी सिमेंट रस्त्याच्या मधोमध खोदकाम केल्याने सिमेंट रस्ते क्षतिग्रस्त झाल्याने मार्गक्रमण करणे कसरतीचे झालेले आहे.

संबंधीत कंत्राटदार पाईप लाईन टाकण्याच्या कामाला गती देत नसून क्षतिग्रस्त सिमेंट रस्ते दुरुस्तीकडे पाठ फिरवलेली आहे. परिणामी नागरिकांमध्ये मनस्ताप पसरलेला आहे. नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. परंतू या ना त्या कारणाने सलग पाणी पुरवठा होत नसुन वर्षभरात किमान ३ महिणेही पाणी पुरवठा झाला नसल्याची येथील नागरिकांची ओरड आहे.

शुध्द पाण्याअभावी येथील नागरिकांना अन्य स्तोत्रातील अशुध्द पाण्यामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने सतत बंद पडणाऱ्या योजनेला दुरुस्त करावे अशी मागणी ग्रामवासीय आणि उपसरपंच यांनी केली आहे.

## आंबोली येथे रासेयो शिबिर सुरू

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ९ जानेवारी :** तालुक्यातील कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी चे रासेयो विभाग व ग्राम पंचायत आंबोली यांचे सहकार्याने जिल्हा परिषद उच्च पाथमिक शाळा, आंबोली येथे ०९ ते १५ जानेवारी दरम्यान सात दिवसीय युथ फार माय भारत व युथ फार डिजिटल या विषयावर महाविद्यालयीन विशेष शिबिर सुरू झालेले आहे. ९ जानेवारी ला सकाळी १० वाजता शिबिरार्थिचे आंबोली येथे आगमन, परिसर स्वच्छता व शिबिर उभारणी करून शिबीराचे मान्यवरांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणुन चिमूर चे तहशिलदार श्रीधर राजमाने, अध्यक्ष सुनिल जावळेकर, विशेष अतिथी अप्पर तहसील भिसी च्या तहशिलदार निलीमा रंगारी, प्रमुख अतिथी म्हणुन वसंत वारजुकर, प्रा.डॉ श्याम खंदारे, प्रा.डॉ रूपेंद गौर, धर्मेन्द्र मुनघाटे, डॉ अरूण प्रकाश, डॉ अश्विन चंदेल यांच्या उपस्थितीत उद्घाटन समारोह संपन्न झाला. पशु वैद्यकीय तपासणी शिबिर, पर्यावरण संवर्धनासाठी युवक, डिजिटल साक्षरता आणि युवक, शिबिरार्थिंच्या बौद्धिक स्पर्धा, सामुदायिक पार्थना, शनिवार ला आरोग्य व रक्तक्षय तपासणी शिबिर आदि विविध उपक्रमाचे आयोजन केले आहे.

## सुमठाणा येथील मोबाईल टॉवर उभारणीचे काम बंद करा

### भीम आर्मीचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ९ जानेवारी :** शहरानजिक असलेल्या महात्मा फुले नगर (नवीन सुमठाणा) येथील एका खाजगी भुखंडावर मोबाईल टॉवर उभारणीचे काम सुरू आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना भविष्यात त्रास होणार असून हे काम त्वरित बंद करण्यात यावे अशी मागणी भीम आर्मी संघटनेच्या वतीने गुरूवारी निवेदन सादर करत भद्रावतीच्या मुख्याधिकारी यांना करण्यात आली आहे.

भद्रावती शहराच्या नजीक असलेल्या महात्मा फुले नगर येथे एका खाजगी भूखंडावर मोबाईल कंपनीच्या टॉवर उभारणीचे काम सुरू आहे. या बांधकामाच्या परिसरात नागरी रहिवाशांची वसाहत असून परिसरातील अशोक नगर येथील नागरिकांनाही या टॉवरच्या रेडिएशन मुळे भविष्यात आरोग्याच्या विविध समस्यांचा सामना करावा लागणार



आहे. टॉवर उभारणीसाठी खोदण्यात आलेला खड्डा त्वरीत बुजविण्यात यावा तसेच खाजगी कंपनीच्या मोबाईल टॉवर साठी नगरपरिषदेने परवानगी नाकारून सदरचे बांधकाम त्वरित बंद करावे अशी मागणी भीम आर्मी संघटनेच्या वतीने नगराध्यक्षांना करण्यात आली आहे.

मोबाईल टॉवरचे काम बंद न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा भीम आर्मीचे भद्रावती तालुका अध्यक्ष राजरतन पेटकर यांनी दिला आहे. यावेळी शहर अध्यक्ष थॉमस दुधे, सोनू सिंग, सचिन नारायने, सिद्धार्थ बुरचुंडे तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनसेची माजी नगरसेविका सीमा रामेडवार यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जानेवारी :** शिवसेनेचे मुख्य नेते तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत



तसेच विधानपरिषद आमदार डॉ.मनीषा ताई कायंदे व विदर्भ संपर्क प्रमुख किरण पांडव यांच्या आदेशाने चंद्रपूर संपर्क प्रमुख राय काका व जिल्हाप्रमुख नितीन मत्ते यांच्या मार्गदर्शनात मनसेची माजी नगरसेविका सीमा रामेडवार सह नेहरू शामुगवेल व मोनित येरावार यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

कार्यक्रमात महिला जिल्हाप्रमुख प्रतिमा ठाकुर, महानगर प्रमुख भरत गुप्ता, वैद्यकीय जिल्हाप्रमुख अश्विन उईके, बल्लारपुर तालुका प्रमुख पंकज वडडेट्टीवार, महिला उपजिल्हाप्रमुख माया ताई मेश्राम, शहर प्रमुख वाणी ताई सदालावर, उपशहर प्रमुख अंजु लेंगुरे, उपशहर प्रमुख शैलेश सदालावार, नयन जंगम, तेजस गाणार, राजू एटलावार व शिवसैनिकांची उपस्थिती होती

## शिवशाही प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य चिमूर तालुका अध्यक्षपदी शुभम गजभिये



**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ९ जानेवारी :** सामाजिक बांधिलकी समाजाप्रती तत्परता बघता, 'शिवशाही प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष राज गोविंद जाधव यांनी शुभम विजय गजभिये यांची चिमूर तालुका अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.

पुढील काळात अधिक प्रमाणात संघटन बळकट करण्यासाठी व अन्याया विरुद्ध आवाज उठविण्यासाठी शुभम विजय गजभिये यांच्यावर संस्थापक अध्यक्ष राज गोविंद जाधव यांनी विश्वास दाखवला आहे.

## हरदोना येथे दोन दिवसीय नैसर्गिक सेंद्रिय शेती प्रशिक्षण

**महासागर प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ९ जानेवारी :** कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) चंद्रपूर तसेच संवर्ग विकास समिती अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत संस्था पातळीवरील सेंद्रिय शेती विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण प्रकल्प संचालक आत्मा यांच्या मार्गदर्शनात शिवमांगल्य् शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या सहकार्यातून हरदोना येथे पार पडले.

राजुरा तालुक्यातील हरदोना येथे ६ ते ७ जानेवारी दरम्यान नैसर्गिक सेंद्रिय शेती या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण पार पडले.या कालावधीत राजुरा, कोरपना, जिवती, गोंडपिपरी व बल्लारपूर तालुकक्यातील सेंद्रिय गटाचे गट प्रमुख तथा अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्धघाटन तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे आर.आर. गादंगिवार, कृषि पर्यवेक्षक तसेच शिवमांगल्य् शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष गणेश वाभिटकर, अशोक ढवळे, संचालक ज्ञानेश्वर घाटे प्रामुख्याने उपस्थित होते.सदर प्रशिक्षणाला सर्ग विकास समितीचे शिवाजी भारती, यांनी सेंद्रिय शेतीची संकल्पना, मूलतत्वे, वैशिष्ट्ये, गरज आणि महत्व याविषयी मार्गदर्शन केले. सुरज थोरात यांनी वनस्पतीजन्य किडनाशक निर्मीती व वापर आणि फायदे



याविषयी मार्गदर्शन केले. योगेश सोनवणे यांनी बायोडायनामिक कंपोस्टिंग विषयी मार्गदर्शन केले. प्रसाद वाघ यांनी कल्चर निर्मिती व वापर विषयी मार्गदर्शन केले. दुर्गादास मोरे यांनी गांडूळ खत कल्चर निर्मिती वापर व फायदे या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी वाघ, सोनवने यांनी गांडूळ कल्चर निर्मिती, सिपीपी कल्चर निर्मिती व बीडी कॉम्पोस्ट इ.जैविक निविष्ठा, अशोक ढवळे, हरदोना यांच्या शेतात प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. सदर प्रशिक्षण यशस्वी करितासाठी घागी, चंदनबटवे, धानोरकर, कन्नाके आणि झोडे यांनी परिश्रम घेतले.

# ना.नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे महाराष्ट्रातील १.५ लाख बेरोजगार अभियंत्यांना रोजगार मिळाले

## महाराष्ट्र इंजिनीयर असोशिएशनचे राज्याध्यक्ष इंजि. प्रदिप पडोळे यांचे प्रतिपादन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जानेवारी :** राज्याचे नेते नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे महाराष्ट्रातील १.५ लाख बेरोजगार अभियंत्यांना रोजगार मिळाले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र इंजिनीयर असोशिएशनचे राज्याध्यक्ष इंजि. प्रदिप पडोळे यांनी केले आहे.

महाराष्ट्र इंजिनीयर असोशिएशन चंद्रपूर शाखेची आढावा बैठक व नविन कार्यकारीणी गठीत केल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

महाराष्ट्र इंजिनीयर असोशिएशनची स्थापना १९९६ साली करण्यात आली. त्यावेळी महाराष्ट्रात ६००० बेरोजगार अभियंता होते व महाराष्ट्र इंजिनीयर असोशिएशन हि एकमेव संघटना राज्यात कार्यरत होती. संघटनेचे पहिले अधिवेशन १९९८ साली झाले. यात तत्कालीन सार्वजनिक



बांधकाम मंत्री ना. नितीन गडकरी यांनी बेरोजगार अभियंतांना ५ लाखाच्या नोंदणीवरून वाढ करीत १५ लाखाच्या नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आला तसेच पहिल्यांदाच महाराष्ट्रात बेरोजगार अभियंत्यांना ५ लाखाचे थेट काम वाटप समिती मार्फत लॉट्री पध्दतीने देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयातूनच पुढे बेरोजगार अभियंत्यांना स्वावलंबी होण्याचा मार्ग मिळाला. आजघडीला महाराष्ट्रात एकुण १ लाख ६५ हजार स्थापत्य अभियंता व १५ हजार विद्युत अभियंता नोंदणीकृत आहे. महाराष्ट्र इंजिनीयर असोशिएशन हे बेरोजगार अभियंतांच्या हितासाठी व मागण्यासाठी लढा देणारी मागील ३० वर्षापासुन एकमेव व सर्वात मोठी संघटना आहे. संघटनेचे आज घडीला २८ हजार नोंदणीकृत सदस्य आहे. तसेच महाराष्ट्रातील एकुण ३० जिल्हात कार्यकारणी कार्यरत आहे. महाराष्ट्र इंजिनीयर असोशिएशन च्या प्रयत्नातून आज घडीला एका अभियंताला ५ लाखावरून १.५ कोटीची वर्गात नोंदणी मिळत आहे. व ५ लाखाच्या कामावरून आजघडीला ३ कोटीचे काम वाटप समितीमार्फत दिल्या जात आहे. जिल्हापरिषद विभागात ५० लक्षाची नोंदणी व १ कोटीचे काम वाटप केले जाते. जिवन प्राधिकरण (पाणी पुरवठा विभाग) विभागात १.५ कोटीचे नोदणीकरण व ३ कोटीचे काम एका अभियंताला दिले जाते. महाराष्ट्र इंजिनीयर असोशिएशन हि महाराष्ट्रातील सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्याची एकमेव नोंदणीकृत व शासनमान्यता प्राप्त संघटना आहे. आतापर्यंत ९० टक्के शासन निर्णय व परिपत्रक या संघटनेच्या पाठपुरावा मार्फत मंत्री महोदय सोबत बैठक व राज्य अधिवेशनात काढण्यात आले आहे.

आढावा बैठकीत महाराष्ट्र इंजिनीयर असोशिएशन चे राज्याध्यक्ष इंजि. प्रदिप पडोळे , महासचिव एम. ए. हकिम व निवडणूक निर्णय अधिकारी इंजि. प्रकाश गड़े, नदिड निवासावान इंजि. दिलीप बाळस्कर, जेष्ठ अभियंता तथा यशस्वी उद्योजक विठ्ठल मामीडवार यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र इंजिनीयर असोशिएशन चंद्रपूर जिल्हाध्यक्ष पदी इंजि. सुदिप रोडे कार्यकारी अध्यक्ष प्रणय धोबे सा.बा., कार्यकारी अध्यक्ष रमीत शेख जि.प. जिल्हा उपाध्यक्ष विक्रात बुरडकर सा.बा., जिल्हा उपाध्यक्ष कौस्तुभ खांडरे जि.प. सचिव सुरज गौरकार शहर अध्यक्ष योगेश भांदककर सा.बा. शहर अध्यक्ष शोएब शेख जि.प. आदिसह कार्यकारणीची घोषणा करण्यात आली.

## ओबीसी महामंडळाची एकरक्कमी व्याज परतावा योजना

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जानेवारी :** ओबीसी महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एकरक्कमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत देण्याबाबतची एकरक्कमी परतावा योजना दि.३१ मार्च २०२५ पर्यंत राबविण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. सर्व योजनेंतर्गत कर्ज खाते बंद करू इच्छिणारे लाभार्थी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील. त्याअनुषंगाने, महामंडळाच्या योजनेतील थकबाकीदार लाभार्थीनी सदर योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## वॉकथान फॉर बचपन स्पर्धेचे १२ जानेवारीला आयोजन : स्पर्धेत सहभागी व्हा - डॉ. विवेक शिंदे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ९ जानेवारी :** भद्रावती शिक्षण संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन दि.१२ जानेवारी रविवारला करण्यात आले आहे. ही स्पर्धा यशवंतराव शिंदे ज्युनिअर कॉलेजच्या पटांगणावर सकाळी ७ वाजता घेण्यात येणार आहे. अशी माहिती संस्थेचे सचिव डॉ. विवेक शिंदे यांनी पत्रपरिषदेत दिली.

मॅराथॉन स्पर्धेचे हे पाचवे वर्ष आहे. दरवर्षी वेगळ्या विषयाला हात घालून ही स्पर्धा घेतली जाते. यापूर्वी रन फॉर युनिटी, रन फॉर डॉटर, रन



फॉर फ्रेंडशिप, रन फार महाराष्ट्र या नावाने या स्पर्धा पार पडल्या.यावर्षी वॉकथान फॉर बचपन या नावाने ही मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेचा मार्ग ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यक्रम स्थळ ते जुना बसस्थानक परत कार्यक्रम स्थळ, इतरांना कार्यक्रम स्थळ ते गणेश मंदिर प्रवेशद्वार ते कार्यक्रम स्थळ असा राहील असल्याचे डॉ.शिंदे यांनी सांगितले.

आजच्या मोबाईल युगातील ही नवीन पिढी आपले बालपण विसरत चालले आहे. आधीच्या काळातील मित्रांच्या सहवासातील खेळ, शाळेतील मस्ती या गोष्टींचा नवीन पिढीला जुन्या पिढीकडून उजाळा देण्याचा हा प्रयत्न आहे. नेहमीप्रमाणे यावर्षी सुद्धा समस्त भद्रावतीकरांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा. असे आवाहन डॉ. विवेक शिंदे यांनी केले आहे.

यावेळी संस्थेचे संचालक डॉ.कार्तिक शिंदे, प्राचार्य एल.एस. लडके ,डॉ.जयंत वानखेडे, डॉ.अपर्णा धोटे, अजय आसुटकर आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्याच्या दौऱ्यात वाहतुकीत बदल

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जानेवारी** : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १० जानेवारी २०२५ रोजी चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून येथील प्रियदर्शनी सभागृह येथे आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमाकरिता नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असून कार्यक्रमादरम्यान उपस्थित असणारे मान्यवर व इतर नागरिकांची वरोरा नाका ते प्रियदर्शनी चौक या मार्गावरून आगमन व निर्गमन होणार असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून वाहतुकीला अडथळा होऊ नये म्हणून या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक बंद ठेवण्यात येत आहे. मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम-३३(१)(ब) नुसार सार्वजनिक ठिकाणी सुरळीत रहदारी व सुव्यवस्था राखण्यासाठी उपयोजना व नियमनासाठी सदर दौरा कार्यक्रम असलेल्या मार्गावर रहदारी बंद ठेवली जाईल

## बाल महोत्सवाचा समारोप

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जानेवारी** : जिल्ह्यातील शासकीय तथा निमशासकीय बालगृहातील मुलांचा शारीरिक व मानसिक विकास व्हावा तसेच इतर मुलांसोबत स्पर्धा करण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या चाचा नेहरू बाल महोत्सवाचा समारोप नुकताच करण्यात आला. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सव २ ते ४ जानेवारी या कालावधीत घेण्यात आला. अध्यक्षस्थानी सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर प्रशांत कुळकर्णी तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी उपस्थित होते.

# अमृत योजना पाईपलाईन टाकण्याच्या कामात भ्रष्टाचार - सुरेश पचारे

### पाईपलाईन कामाची चौकशी करून नागरीकांचे समाधान करावे



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जानेवारी** : चंद्रपूर शहरवासियांना शुद्ध आणि मुबलक पेयजल मिळण्याच्या उद्देशाने शहरात अमृत योजना महानगरपालिके द्वारे राबविण्यात येत आहे. परंतु योजनेचे पाईपलाईन टाकण्याचे कामात ठेकेदाराकडून चुकीचे नियोजन आणि सावळागोंधळ होत असल्याने शहरातील नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. शहरात चुकीच्या पध्दतीने टाकण्यात येणाऱ्या पाईपलाईन च्या कामाची चौकशी करून काम थांबविण्याची मागणी माजी नगरसेवक सुरेश पचारे यांनी पत्रकार परीषदेत केली आहे. अन्यथा नागरीकोंसोबत रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा पचारे यांनी दिला आहे.

चंद्रपूर शहरातील शास्त्रीनगर प्रभाग क्रमांक २ येथील तिर्थरूप नगर येथे अमृत योजने चे पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. पाईप लाईन टाकण्यासाठी संपूर्ण रस्ते अंदाजे पाच ते दहा फुट खोल खोदण्यात आले आहे. यात चार ते पाच फुटांचे अवाढव्य पाईप टाकण्यात आले असुन खोदकामात ठेकेदाराच्या दुर्लक्षपणामुळे नागरीकांचे नळ कनेक्शन पाईप, सिवरेज पाईप तोडण्यात आले असल्याने मागिल काही दिवसांपासूना नागरीकांना पेयजल संकटाचा का सामना करावा लागत आहे. पाईप लाईन खोल भुमिगत असल्याने पूढे मेंटनन्ससाठी मोठी समस्या निर्माण होणार आहे.

अमृत योजनेच्या कामात तांत्रीक चुकी झाली आहे. वारंवार होत असलेल्या रस्त्याच्या खोदकामामुळे धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. अमृत योजनेमुळे चांगल्या स्थितीतील डांबर रस्ते फोडण्यात आले. चांगल्या स्थितीतील नाल्या देखील फोडण्यात आल्यामुळे नागरीकों का वाहने आणेनेणे कठीण झाले आहे.

या अगोदरच महानगरपालीकाचे विकास कामाकडे दुर्लक्ष आहे. जनतेला अनेक वर्ष रस्ते, नाली, नळ आदि मुलभुत सुविधा दिल्या गेल्या नाही. अशी विदारक स्थिती असताना एकदा झालेले रस्ते, नाली, नळ पाईपलाईन फोडण्यात येत असल्याने नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा पासून वंचित ठेवण्याचे काम अमृत योजने चा कंत्राटदार करीत आहे असा आरोप सुरेश पचारे यांनी केला आहे.

अमृत योजनाचे कामात होणारी अनियमितता आणि समस्यांची चौकशी करून कंत्राटदार दोषी आढळल्यास त्याचे त्वरीत कार्रवाई करून काम थांबवुन त्रस्त जनतेला दिलासा देण्याची मागणी पचारे यांनी मनपा प्रशासनाकडे केली आहे अन्यथा पिडीत जनतेसोबत रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचाय इशारा दिला आहे.

पत्रकार परीषदेला चंदु पेतंटीवार, विजय वेरपुलवार, दत्ता कासर्लेवार, चंदु नागदेवते, शंकर पचारे, दोनाडकर, प्रमोद टेपलवार उपस्थित होते.

# घुग्घुस येथील 'आप'चे अमित बोरकर, काँग्रेसचे गणेश उईके शिवसेनेत

### शिवसेना स्वबळावर नगरपरिषद निवडणूक लढविणार : संदीप गिऱ्हे



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ९ जानेवारी** : शहरातील आम आदमी पक्षाचे माजी शहराध्यक्ष अमित बोरकर काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते गणेश उईके, पवन नागपुरे यांनी ८ जानेवारी रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षात जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे व हेमराज बावने यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश घेतला.

याप्रसंगी जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे यांनी नगरपरिषदेच्या सर्वच २२ जागेवर निवडणूक लढविण्याचा निर्धार व्यक्त केला असून शहरातील पहिला नगर अध्यक्ष हा शिवसेनेचा असणार अशी आशा व्यक्त केली आहे.

याप्रसंगी (उबाठा) शहर प्रमुख घुग्घुस बंटी (चेतन) घोरपडे, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते प्रभाकर चिकणकर, सुधाकर चिकनकर, अजय जोगी, योगेश भांदककर, रघुनाथ धोंगळे, वेदप्रकाश मेहता व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# चिमुकल्या स्वरांशचे सामान्य ज्ञान अचाट



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. ९ जानेवारी** : वय वर्षे जेमतेम तीन वर्ष ,परंतु आपल्या अगाथ सामान्य ज्ञानाचा मुख पाठ परिचय देऊन नारडा येथील स्वरांशने आमदारांनाही चकित करून मान गये छोटे उस्ताद चा देण्यास शेरा देण्यास बाध्य केले.

तालुक्यातील नारंडा या गावात सचिन काकडे हे शेतकरी राहतात. आपल्या मुलाची भविष्यात उत्तरोत्तर प्रगती व्हावी. यासाठी त्याला नियमित सामान्य ज्ञानाचे धडे देत असतात. त्याला सकारात्मक घेत चिमुकला स्वरांश ही तो धडे आनंदाने गिरवतो. त्याला अगदी गावच्या सरपंचापासून आमदार खासदार मुख्यमंत्री पंतप्रधान, राष्ट्रपती, विविध देश व राज्याच्या राजधान्या तसेच गावातील विविध व्यक्तीची एकदा माहिती सांगितली की तो अचूक पणे देतो. त्यामुळे त्याच्या ज्ञानाचे पंचक्रोशित कौतुक व्यक्त होते आहे. याच दरम्यान त्याला त्याच्या गावात राजुरा क्षेत्राचे आमदार देवराव भोंगळे हे येणार असल्याची माहिती कळाली. त्यांनी वडिलाला त्यांची भेट घेऊन देण्यासाठी आग्रह धरला. वडिलांनी त्याचा हट्ट पुरवत भेट घडवून दिली. भेटी दरम्यान आमदार महोदयांनी त्याच्याशी हितगुज केली. त्यादरम्यान त्यांनी अनेक प्रश्न सुद्धा त्याला विचारले. त्यांनी त्याना प्रत्येक प्रश्नाचे अचूक उत्तरे देत आपल्या सामान्य ज्ञानाचा परिचय करून दिला. त्याच्या या कृतीने चक्क आमदार भोंगळे ही भारावून गेले. तसेच त्याला भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ९ जानेवारी** : चिमूर तालुक्यातील नेरी येथील वाय एस पवार कला व वाणिज्य महाविद्यालयात स्त्री शिक्षणाच्या उद्धार कर्त्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाप्रसंगी एडवोकेट नागदेवते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डी. एच. वैद्य उपस्थित होते.

मुलींचे शिक्षण हे त्यांच्या विकासाचे एकमेव स्त्रोत आहे आणि त्यामुळे मुलींनी उच्चशिक्षित होऊन सर्व क्षेत्रांमध्ये आपली प्रगती केली तरच सावित्रीबाई फुले यांच्या त्यागाचे फलित होईल असे मार्गदर्शन केले.

प्रा. रामटेके मॅडम हे सुद्धा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या त्यांनी 'सावित्री नसती तर मुलगी शिकली असती काय ?' या गाण्याने आपल्या मार्गदर्शनाची सुरुवात केली आणि मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्रा. टेंभुर्णे मॅडम प्रा. श्रीराम सर, प्रा. दुधनकर सर, प्रा. बोरकर सर, प्रा. खंडारे मॅडम, प्रा. शेख सर आणि दीक्षांत, पराग, स्वप्नील आणि दीपक इ. कर्मचारी, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन कैलास बोरसरे यांनी, तर कार्यक्रमाचा समारोप आफरीन शेख या विद्यार्थिनींनी केला. कार्यक्रमात विद्यार्थी कार्यक्रमात सहभागी झाले होते.

# बाबूपेठ वासीयांचा कँडल मार्च, अल्पवयीन मारेकऱ्यांना कठोर शिक्षा द्या

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जानेवारी** : चंद्रपूर शहरात ३ जानेवारीला चार अल्पवयीन मुलांनी १९ वर्षीय मुलाची दगडाने ठेचत क्रूर हत्या केली होती, अल्पवयीन मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी या मागणीसाठी बाबूपेठ वासीयांनी ८ जानेवारी रोजी सायंकाळी केंडल मार्च काढला. डीएड कॉलेजच्या मैदानावरून निघालेला हा कँडल मार्च प्रभागातील भ्रमण करीत नेताजी चौकात पोहचला.




३ जानेवारीला बाबूपेठ निवासी तन्मय जावेद खान हा १९ वर्षीय मुलगा सायंकाळी घरी येत होता वाटेत महाकाली मंदिर जवळ काही अल्पवयीन मुलांच्या दुचाकीला तन्मय च्या वाहनाने कट लागली.

आमच्या वाहनाला कट का मारली म्हणून अल्पवयीन मुलांनी तन्मय सोबत वाद घालत त्याला मारहाण केली, त्यानंतर तन्मय ला दुचाकी वाहनाला झालेल्या नुकसानीची भरपाई मागितली, तन्मय ने पैसे नसल्याचे सांगताच चार अल्पवयीन मुलांनी गौतमनगर भागात तन्मयला नेत त्याची दगडाने ठेचत अत्यंत क्रूरपणे हत्या केली.

या घटनेचा निषेध व्यक्त करीत आज बाबूपेठ भागातील नागरिकांनी तन्मय च्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी या मागणीसाठी कँडल मार्च काढला.

कँडल मार्च नेताजी चौकात पोहचल्यावर नागरिकांनी मनातील संताप व्यक्त केला, मारेकरी मुलांना आमच्या स्वाधीन करा आम्ही त्यांचा बंदोबस्त करु अशी मागणी यावेळी करण्यात आली, पोलिसांचे मूल असे गुन्हे करीत आहे म्हणून प्रशासन मारेकऱ्यांची पाठराखण करीत आहे असा आरोप नागरिकांनी यावेळी केला.

मारेकरी अल्पवयीन मुलांना कठोर शिक्षा व्हायला हवी याबाबत तन्मय च्या आईने पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांची भेट घेत निवेदन दिले.

# काँग्रेस कमिटीतर्फे खा. धानोरकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमात ब्लँकेट व खाद्यपदार्थ वितरण



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ९ जानेवारी** : चंद्रपूर - वणी - आर्णी लोकसभा क्षेत्राचे खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या वाढदिवसा निमित्त ९ जानेवारी २०२५ रोजी नवी दिशा वृद्धाश्रम घुग्घूस येथे काँग्रेस अध्यक्ष राजुरेड्डी व पदाधिकाऱ्यांच्या वतीने कंबल व खाद्यपदार्थ वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला

सदर कार्यक्रमात तालुकाध्यक्ष अनिल नरुले व राजुरेड्डी यांच्या हस्ते वृद्धाश्रमातील वृद्ध महिला पुरुषांना थंडी पासून बचाव करण्यासाठी मऊ व ऊबदार कंबलचे वाटप करण्यात आले सोबतच त्याच्या खाण्यासाठी तोस, बिस्कीट, चिवडा, चिप्स असे खाद्य पदार्थ वितरित करण्यात आले

यासोबतच वृद्धाश्रमातील माता - पित्याच्या हस्ते केक कापून खासदारांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यांच्या दीर्घायुष्य करीता प्रार्थना करण्यात आली.

याप्रसंगी जिल्हा महासचिव पदमा त्रिवेणी, महिला जिल्हा उपाध्यक्ष यास्मिन सैय्यद, शहर कार्याध्यक्ष दिप्ती सोनटक्के, संध्या मंडल, मंगला बुरांडे, सरस्वती कोवे, जिल्हा महासचिव अलीम शेख, जिल्हा सचिव अजय उपाध्ये, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष रोशन दंतलवार, तालुका तालुका सचिव विशाल मादर, मोसीम शेख, तालुका उपाध्यक्ष सिनू गुडला, इंटक जिल्हा उपाध्यक्ष शहजाद शेख, शेखर तंगलापेल्ली, एन.एस.यु.आय अध्यक्ष आकाश चिलका, शेणगाव अध्यक्ष भास्कर सोनेकर, रोहित डाकूर, सुनील पाटील, दिपक पेंदोर, निखील पुनघंटी, दिपक कांबळे, कुमार रुद्रारप, कपिल गोगला, अनवर सिद्दीकी, अंकुश सपाटे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# अखेर आजनसरा बस सेवेस प्रारंभ

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**वरोरा, दि. ९ जानेवारी** : भोजाजी महाराज तीर्थक्षेत्र असलेले आजनसरा ते वरोरा येथे जाणारी बस मागील काही एक वर्षापासून बंद होती. वेगवेगळी कारण देत एसटी महामंडळ बस बंद ठेवत होती त्यामुळे भोजाजी महाराज भक्तांना आजनसरा येथे जाण्यासाठी फार मोठी अडचण जात होती. आजनसरा येथील भोजाजी महाराज देवस्थान मंडळाचे पदाधिकारी तसेच वरोरा तालुक्यातील काही कार्यकर्त्यांनी आ. करण देवतळे यांची भेट घेतली असता त्यांना वरोरा ते आजनसरा तसेच आजनसरा ते वरोरा बस सुरू करण्यात यावी विनंती चे निवेदन देण्यात आले.



त्यावेळी लगेच आ. करण देवतळे यांनी डेपो मॅनेजरला पत्र देऊन प्रत्येक क्षण फोन करून त्वरित आजनसरा सुरू करण्यात यावी असे सांगितले. त्यांच्या प्रयत्नाने एक जानेवारीपासून वरोरा ते आजनसरा ही बस सकाळी साडे आठ वाजता व दुपारी एक वाजता असे दोन वेळी बस सुरू करण्यात आली. त्यामुळे भाविक भक्तामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# आवळगाव येथे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा'या उपक्रमांतर्गत ग्रंथ प्रदर्शन

**महासागर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. ९ जानेवारी** : आवळगांव येथिल सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत वाचन कार्यशाळेचे आयोजन जिल्हा परिषद शाळा आवळगाव येथे करण्यात आले.



महाराष्ट्र शासनाने १ते १५ जानेवारी हा पंधरवडा वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम घ्यायचे ठरविले आहे.याचाच भाग म्हणून शाळेचे मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली या ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रितम बाबणवाडे सरपंच आवळगांव, विठ्ठल किनेकर अध्यक्ष सेवा सह.संस्था, अनिल कामडी, मधुर भांडारकर, रामदास कांबळी आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रितम बाबणवाडे सरपंच यांनी सांगितले की, वाचन का करावे? कसे करावे? परिक्षण कसे करावे? यावर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे संचालन सहा. शिक्षक अशोक कोहपरे यांनी केले.कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशनचा एक सकारात्मक पाऊल

### ग्रामीण विद्यार्थ्यांना उज्वल भविष्य मार्गदर्शन कार्यक्रम




**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ९ जानेवारी** : घुग्घुस येथे ७ जानेवारी २०२५ रोजी लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशनने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी एक उल्लेखनीय पाऊल उचलले आहे. जनता विद्यालय घुग्घूस,विद्यालय येथे आयोजित केलेल्या उज्वल भविष्य मार्गदर्शन कार्यक्रमाद्वारे, लॉयड्स इंफिनाईट फाउंडेशनने या विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्याची दिशा दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. प्रत्येक क्षेत्रात प्रवेशासाठी तीव्र स्पर्धा आहे. या परिस्थितीत,शिक्षण आणि कौशल्य विकास हीच यशस्वी होण्याची चावी आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी भागातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करण्यासाठी आवश्यक असलेल्या संधी आणि मार्गदर्शनाची कमतरता असते.

**लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशनचा योगदान** :

लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशनने या गरजेला ओळखले आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देण्यासाठी पुढाकार घेतला.या कार्यक्रमाद्वारे, विद्यार्थ्यांना विविध भविष्य उज्वल पर्यायांबाबत माहिती मिळाली,आणि त्यांच्या भविष्यातील ध्येय निश्चित करण्यास प्रोत्साहन मिळाले.

यावेळी १० वी तील विद्यार्थ्यांना परीक्षेबाबत मार्गदर्शन व भविष्यात कोणते क्षेत्र निवडायचे!कसे निवडायचे!का निवडायचे व भविष्यात त्याचे महत्व कसे राहतील याबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले या वेळी सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा पॅड सुद्धा वितरित करण्यात आले.

कार्यक्रमात ३०२ विद्यार्थ्यांना परीक्षा पॅड वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला उदघाटक म्हणून लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशन उपव्यस्थापक दिपक साळवे यांनी केले.

सदर कार्यक्रम उदघाटन प्रसंगी बोलताना विद्यार्थी यांनी अभ्यास करून प्राविण्य मिळवावे जे विद्यार्थी उत्तीर्ण होतील अशा विद्यार्थ्यांना लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशन यांच्या माध्यमातून शिष्यवृत्ती देण्यात येईल त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा तसेच विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत खेळ आरोग्यावर अधिक लक्ष द्यावे भविष्यात शैक्षणिक विकासा करिता सी.एस.आर (एऐं) निधी ची विशेष तरतूद करण्यात आली आहे.

तर अध्यक्ष म्हणून शाळेच्या मुख्याध्यापक व्ही.पोले पाहुणे म्हणुन लॉयड्स मेटल्सचे , अनुराग मत्ते,शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करणाऱ्या विरोधात कार्यवाहीची मागणी

### रमानगर वार्ड येथील नागरिकांचे शासकिय अधिका-यांना साकडे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा,दि. ९ जानेवारी** : राजुरा शहरातील रमानगर येथे पस्तीस वर्षांपूर्वी वसलेल्या गरीब व कष्टकरी नागरिकांच्या वस्तीत तेथील नागरिकांनी काही जागा राखीव ठेऊन तिथे अतिक्रमण होऊ न देता हनुमान मंदिर व आदिवासींचे माता मंदिर बांधले. मात्र आता एका व्यक्तीने तिथे आदिवासींच्या टायगर सेनेच्या नावाने कार्यालय बांधून स्वतःच ही जागा बळकावली असल्याचा आरोप रमानगर निवासी नागरिकांनी केला आहे.

यामुळे संपुर्ण वार्डात संताप व्यक्त करण्यात येत असून तातडीने अतिक्रमण हटवून हे कार्यालय आदिवासी समाजाच्या ताब्यात देण्याची मागणी रमानगर वार्डातील नागरीकांनी दिनांक ७ जानेवारी ला पत्रकार परिषदेत केली.



राजुरा शहरातील रमानगर येथील बेघरवासी नागरिक सन १९९० पासून अतिक्रमण करून रमानगर येथे राहात आहेत. त्यावेळी सर्व वार्डवासीयांनी सर्वसंमतीने प्रभाकर झोडे ते सुधीर खंडाते यांच्या घरापर्यंतची जागा सार्वजनिक वापरासाठी राखीव ठेवण्याचे ठरविले आणि गेली ३५ वर्ष कुणाचेच अतिक्रमण होऊ दिले नाही. या भागात सर्वधर्मीय लोक असले तरी अतिशय गुण्यागोविंदाने सर्व येथे राहतात. दरम्यान येथे हनुमान मंदिर, आदिवासींचा ध्वज व माता मंदिर सर्वांनी मिळून बांधले. या दोन्हींचे मध्ये थोडी जागा होती. या जागेत जयंती, पुण्यतिथी सारखे कार्यक्रम साजरे होत असत. मात्र नुकतेच येथे आदिवासी टायगर सेनेचे कार्यालय बांधून समाजाच्या कामी येईल, असे सांगुन संतोष कुळमेथे यांनी एक कार्यालय बांधले. चांगल्या कामाला हातभार लावावा, म्हणून अनेकांनी त्यांना सहकार्य केले. मात्र आता येथील आदिवासी टायगर सेनेचे बोर्ड काढून संतोष कुळमेथे यांनी ही जागा व कार्यालय स्वतःचेच असल्याचे सांगितले. यामुळे वार्डात प्रचंड वाद झाला. पोलिसांनाही पाचारण करावे लागले. यानंतर रमानगर वार्डातील सर्व नागरिकांनी तहसीलदार ओमप्रकाश गोंड, नगर परिषद मुख्याधिकारी सारंग मुळीक व ठाणेदार योगेश्वर पारधी यांची भेट घेऊन निवेदन देऊन तातडीने कार्यवाहीची मागणी केली. यासंदर्भात ना.मुख्यमंत्री, महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, खासदार व आमदार यांना निवेदने देण्यात आली. आता तातडीने ही जागा व अवैधरित्या बांधलेले भवन आदिवासी समाजाचे माता मंदिर आणि हनुमान मंदिराच्या ताब्यात द्यावे, अशी मागणी या नागरिकांनी पत्रकार परिषदेत केली. पत्रकार परिषदेला अनिल सिडाम, प्रभाकर झोड, शेखर भोज, अमर कोसरे, दिलीप पेंदोर, पंचू सीडाम, सुलोचना कोसरे, शशिकला झुम्मनवार, रिता भोज, हर्षा भटारकर, कविता झोडे, सुमित्रा कुचनकर यांचेसह मोठ्या संख्येने रमानगर वार्डातील आदिवासी, महिला व नागरीक उपस्थित होते.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

